ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 102-M (NS)**

**Code No. : 102-M (NS)**

# ಶಿಕ್ಷಣ
# EDUCATION
# ಮೂಲ ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳ ಪರಿಚಯ
# INTRODUCTION TO BASIC CONCEPTS

( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ )

( Marathi Version )

( ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು )

( New Syllabus )

ದಿನಾಂಕ : 30. 06. 2015

Date : 30. 06. 2015

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

**भाग – I**

प्रत्येक प्रश्नाला **चार** पर्याय दिलेले आहेत. योग्य पर्यायी उत्तरे निवडून ते उत्तर पत्रिकेत लिहा. **सर्व** प्रश्न आवश्यक. 10 × 1 = 10

1. समुदयाला शालेय प्रशासनात भाग घेण्याची संधी कोणते घटक पुरवितात ?
   (A) मध्यवर्ती शालेय प्रशासन
   (B) सामुदायिक कार्यक्रम
   (C) लोक प्रतिनिधीची निवड
   (D) परिणामकारक विकेंद्रीकरण.

2. सामाजिक परस्पर क्रियेच्या सिद्धांतानुसार आकलनात्मक प्रक्रियेची क्रमगत मांडणी
   (A) ध्यान, धारणा, यांत्रिक प्रतिसाद, प्रेरणा
   (B) धारणा, यांत्रिक प्रतिसाद, ध्यान, प्रेरणा
   (C) ध्यान, प्रेरणा, धारणा, यांत्रिक प्रतिसाद
   (D) धारणा, ध्यान, यांत्रिक प्रतिसाद, प्रेरणा.

3. समावेशक शिक्षणाची संकल्पनेचा परिणाम पुढील पैकी कोणत्या घटकावर आधारीत आहे ?

   I. बालकाच्या अध्ययनाशी संबंधित

   II. अपंगाबद्दल सहानुभूती

   III. सामाजिक न्याय.

   **या पैकी :**

   (A) I, II आणि III (B) I आणि III

   (C) I आणि II (D) II आणि III.

4. पाठाचा विकास पायऱ्यामध्ये पुढील पैकी कोणती चाचणी शिक्षक वापरतो ?

   (A) आकलनात्मक मौल्यमापन (B) नैदानिक चाचणी

   (C) संकलनात्मक मौल्यमापन (D) साफल्य चाचणी.

5. आकलनात्मक वर्षादरम्यान लिंगाधारीत भूमिकेवर परिसराचा कोणता प्राथमिक प्रभाव पडतो ?

   (A) राजकीय (B) शैक्षणिक

   (C) कौटुंबिक (D) मानसिक.

6. अध्यापनासाठी अध्ययनला यांचा समावेश असतो.

   I. मानसिक क्षमतांचा विकास

   II. विषयाचे सखोल आकलन

   III. पाठ्य पुस्तकाची संपूर्ण माहिती

   IV. मुलाना समजून देणे.

   **या पैकी :**

   (A) I, II आणि III (B) I आणि II

   (C) III आणि IV (D) I, II आणि IV.

7. शिक्षकाचा व्यावसायिक विकास त्याना या मध्ये गुंतवून साधला जातो.

   (A) गणती कार्य

   (B) अभ्यास क्रमाशी संबंधीत साहित्याचा विकास

   (C) निवडणूक कार्य

   (D) सततचे प्रशिक्षण.

8. 'सर्वांसाठी शिक्षण' साधण्याचा महत्वाचा घटक

   (A) घटकांशावर आधारीत अध्यापनावर भर

   (B) शाळांचे सौंदर्यीकरण

   (C) सामाजिक नेते आणि पालकांचा सहभाग

   (D) हुषार विद्यार्थ्यांना सामावून घेणे.

9. अपंग मुलागा शाळेतील स्वच्छता गृहे वापरण्यास असमर्थ ठरतो. या परिस्थितीत मुलाला कोणत्या अडथळयाना सामोरे जावे लागते ?

(A) रचनात्मक बांधणी (B) शारिरीक

(C) बौद्धीक (D) मानसिक.

10. कर्नाटक राज्यातील सर्वात जास्त पसरलले शैक्षणिक जाळे

(A) वसती शाळा (B) माध्यमिक शाळा

(C) नवोदय शाळा (D) प्राथमिक शाळा.

### भाग – II

खालील पैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **अर्धा** पानापेक्षा जास्त असू नये. 5 × 2 = 10

11. परिणामकारक शिक्षणशास्त्राचे महत्व काय ?

12. आरक्षण धोरणातील दोन फायद्यांचे वर्णन करा.

13. अध्ययनाचे दोन विशेष गुणधर्म लिहा.

14. शाळेची सुही लिंग भूमिकेनुसार कशी रुढीबद्ध कराल ?

15. समवयस्कांच्या गणनेचे महत्व लिहा.

16. सर्व शिक्षण अभियानात अंतर्भूत केलेले दर्जात्मक शिक्षणाच्या कोणत्याही चार घटकांची यादी करा.

17. पौंगंडावस्थेला आदर्शवादाचा कालखंड का मानला जातो ?

18. 'स्टर्नबर्गच्या विद्वता एक प्रक्रिया आहे' या मतावर आधारीत दोन घटक लिहा.

### भाग – III

खालील प्रत्येक प्रश्नाला पर्याय प्रश्न आहेत. त्या पैकी कोणत्याही **एकाचे** उत्तर लिहा. प्रत्येकाचे उत्तर **एका** पानापेक्षा जास्त असू नये. 8 × 5 = 40

19. रचनात्मक अध्यापन–अध्ययन कृतीची पाच वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

खेळाच्या संदर्भात मुलाची सामाजिक मानसिकता स्पष्ट करा.

20. सामाजिक संदर्भात अध्ययन स्पष्ट करा.

**किंवा**

सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत संस्कृतीची भूमिका काय ? उदाहरणासह स्पष्ट करा.

21. वर्गामध्ये वैविध्य एक स्त्रोत म्हणून वापर करण्यासाठी तुमच्या आवडीची पाठ योजना तयार करा.

**किंवा**

इ० 5वी विद्यार्थ्यासाठी तुम्हाला त्रिकोणाची संकल्पना विकसित करावयाची आहे. मुलाच्या आवडीला अनुसरुन हा अध्ययन पहिल्या 15 मिनिटासाठी वर्गात सादर करा. तुमची पाठ योजना मुलाच्या आवडीनुसार आहे हे स्पष्ट करा.

22. शिक्षकासाठी शैक्षणिक समाजशास्त्राचा अभ्यास महत्वाचा आहे यावर चर्चा करा.

**किंवा**

विद्यार्थ्यांच्या सामाजिकीकरणात शिक्षकाची भूमिका कोणती ? यावर चर्चा करा.

23. अनुभवी अध्ययनाच्या सिद्धांताचा तुम्ही स्वत:साठी उपयोग कसा कराल ?

**किंवा**

अध्ययनाचा सराव आणि प्रशिक्षणादरम्यान NCFTC, 2009 च्या यादीतील कोणता अनुभव तुम्हाला शिक्षकाचे गुण आत्मसात करण्यास सहाय्यक ठरतात ? का ?

24. तुमच्या अनुभवावर आधारीत परिणामकारक देवाण घेवाणी साठी काळजी पूर्वक योजनेची भूमिका स्पष्ट करा.

**किंवा**

व्यक्तीमत्वाच्या वेगवेगळ्या पैलुच्या विकासासाठी खेळाची भूमिका स्पष्ट करा. खेळाच्या कोणत्या घटकाचा तुम्ही वापर कराल ?

25. काही शिक्षक तज्ञाना असे वाटते की विशेष प्रतिभावंत ( gifted ) मुलांना अतिरिक्त ध्यान देण्याची गरज नाही हे मत का मर्यादित करु शकतो ? यावर चर्चा करा.

**किंवा**

NCERT, 2005 च्या शिफारसीना अनुसुचित जाती आणि जमातीच्या शिक्षणात कशा अंतर्भूत कराल ?

26. विद्यार्थ्यांच्या चूका त्यांचे विचार समजून घेण्यासाठी शिक्षकांना कशी संधी देतात / पुरवितात ? तुमचे उत्तर उदाहरणासहीत स्पष्ट कराल.

**किंवा**

तुम्ही शाळेत शिक्षक म्हणून असताना अध्ययनाच्या कोणत्या पायऱ्यांचा अनुभव घेतला ? अध्ययनाच्या पायऱ्या वर्गातील अध्ययनाला कशा सहाय्यक ठरतात हे उदाहरणासह स्पष्ट करा.